अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांच्या शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती /वैयक्तीक मान्यता/समायोजनाबाबत

महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

शासन निर्णय क्रमांकः व्हिओसी-२०१७/प्र.क्र.४/व्यशि-४,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १२ सप्टेबर, २०१७

संदर्भ :

१) संचालक (व्यवसाय शिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक ६/अल्प/पदभरती/अ-२/२२०३/२०१६/३२० दिनांक २६/९/२०१६.

प्रस्तावना :

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत असलेल्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थातील विद्यार्थी पट संख्येच्या आधारावर शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी झाल्यास संस्थेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त ठरतात व त्यांचे समायोजन महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सवेच्या शर्ती) नियमावली १९८१, नियम २६ अनव्ये बिंदु नामावलीनुसार व विषय साधर्म्यानुसार अन्य शाळेतील रिक्त पदावर करण्यात येते. व अल्पसंख्यांक संस्थांच्या शाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त ठरल्यास त्या कर्मचाऱ्यांचे त्याच धर्माच्या/भाषेच्या अन्य अल्पसंख्यांक संस्थेच्या शाळेमध्ये समायोजन करण्यात येत होते.

२. तथापि सर्वोच्च न्यायालयाचे अहमदाबाद सेंट झेविअर्स कॉलेज सोसायटी विरूध्द गुजरात राज्य (AIR १९७४ SC १३८९) आणि T.M.A. Pai Foundation Vs State of Karnataka २००२ (८) SCC ४८१ तसेच सेक्रेटरी मलनकारा सिरीयन कॅथेलिक कॉलेज विरूध्द टी. जोस व इतर (२००७) १ SSC ३८६ यामधील न्यायनिर्णय तसेच सदर न्यायनिवाड्याच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायलय, मुंबई, खंडपीठ नागपूर व इतर राज्यातील उच्च न्यायालयांनी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार सर्व अल्पसंख्यांक संस्थांना स्वत:ची संस्था सुरू करण्याचा व त्याचे प्रशासन चालविण्याचा भरतीय राज्यघटना कलम ३०(१) नुसार मूलभूत अधिकार प्राप्त झालेला आहे. त्यामुळे सदर अल्पसंख्यांक संस्थांमध्ये समायोजनाव्दारे कर्मचारी उपलब्ध करून देणे ही त्यांच्या मूलभूत हक्कापैकी धार्मिक किंवा भाषिक अल्पसंख्यांक संस्थांबाबत कलम ३०(१) मधील तरतूद पुढीलप्रमाणे आहे. “धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व वर्गांना आपल्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा व त्याचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.”

३. यास्तव सदर तरतूत व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अनुसरून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत असलेल्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थामधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदभरती/वैयक्तीक मान्यता/ समायोजनाबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय :

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत असलेल्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थामधील कर्मचारी पदभरतीबाबत/वैयक्तिक मान्यता/समायोजनाबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१) सर्व धार्मिक किंवा भाषिक आधारावर अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थामधील सर्व अतिरिक्त शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांची स्वतंत्र यादी तयार करावी.

२) प्रथमत: अशा अतिरिक्त शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे त्याच अल्पसंख्यांक संस्थेच्या अन्य शाळेतील रिक्त पदावर समायोजन करण्यात यावे.

३) अल्पसंख्यांक संस्थांना आरक्षणाचे तत्व लागू नसल्याने अ. क्र. २ नुसार कार्यवाही केल्यानंतर संबंधित अतिरिक्त शिक्षकांचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये बिंदुनामावलीनुसार व विषयाच्या आवश्यकतेनुसार समायोजन करण्यात यावे. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये समायोजन करताना आरक्षण कायद्याचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी व त्यासाठी आवश्यकता असल्यास संबंधित सक्षम प्राधिका-याचे जात वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय असे समायोजन करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. आरक्षण धोरणाचे उल्लंघण झाल्याचे आढळून आल्यास धोरणातील कायद्यानुसार दंडात्मक कारवाई अथवा तुरुंगवास किंवा दोन्हीची कारवाई करण्यात यावी.

४) एखादया अल्पसंख्यांक संस्थेमध्ये अतिरिक्त ठरविण्यांत आलेल्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळेत समायोजन केल्यानंतर सदर अल्पसंख्यांक शाळेत पुढील काळात विद्यार्थी संख्येत वाढ झाल्यामुळे भविष्यात जादा शिक्षक कर्मचा-यांची आवश्यकता निर्माण झाल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत समायोजित झालेल्या शिक्षक कर्मचा-यांच्या सेवा मूळ संस्थेकडे वर्ग करण्यात याव्यात.

५) उपरोक्त प्रमाणे रिक्त पद उपलब्ध नसल्यास त्याच धार्मिक अथवा भाषिक अन्य अल्पसंख्यांक संस्थेच्या शाळेमध्ये त्या संस्थेच्या इच्छेनुसार समायोजन करण्यांत यावे.

६) ऐच्छिक समायोजनास सदर संस्था तयार नसल्यास अशा सर्व अल्पसंख्यांक संस्थांनी केलेल्या पदभरतीस महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) अधिनियम १९७७, कलम ५ (१) मधील तरतूदीमधून वगळण्यात यावे. सदर तरतूद मा. सर्वोच्च न्यायालय व काही राज्यांच्या उच्च न्यायालयाच्या न्यायनिवाडयानुसार भारतीय राज्यघटना कलम ३०(१) च्या तरतूदीस बाधा येत असल्याने सदर अल्पसंख्यांक संस्थांनी केलेल्या पद भरतीस वैयक्तीक मान्यता देण्याबाबत उचित कार्यवाही करावी.

७) उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करत असताना अल्पसंख्यांक संस्थामधील अतिरिक्त ठरलेल्या ज्या कर्मचा-यांचे समायोजन होणार नाही त्यांचे समायोजन होईपर्यत त्यांना विनाकाम विनावेतन (No work No pay) या तत्वाच्या आधारे त्यांना वेतन अदा करण्यात

येवू नये. तथापि, अशा अतिरिक्त कर्मचा-यांचे भविष्यात समायोजन झाल्यास त्यांना वेतन संरक्षण देण्यात यावे. परंतु अतिरिक्त असलेल्या कालावधीतील वेतनाची थकबाकी कुठल्याही परिस्थितीत अनुज्ञेय राहणार नाही.

८) ज्या अल्पसंख्यांक संस्थांनी रिक्त पदावरील पदभरतीस परवानगी मागितलेली आहे. त्यास उक्त नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करुन परवानगी देण्यात यावी अथवा ना-हरकत प्रमाणपत्र न घेता अशी पदभरती केली असल्यास अशा पदभरतीस वैयक्तिक मान्यता देण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

९) उपरोक्त प्रमाणे पदभरती करताना अथवा वैयक्तिक मान्यता प्रदान करताना खालील बाबींचे कटाक्षाने पालन करणे बंधनकारक राहील.

अ) संबंधित संस्थेचे प्रतिष्ठित वृत्तपत्रात जाहिरात दिली आहे किंवा कसे याची तपासणी करुन वृत्तापत्राची मूळ प्रत तपासावी. जाहिरातीमध्ये उपलब्ध पदांचा उल्लेख केला आहे किंवा कसे त्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता (माध्यम व विषय), वयोमर्यादा, पद पूर्णवेळ /अर्धवेळ/घडयाळी तास/रजा कालावधी इ तपशील पद अनुदानित/अशंत: अनुदानित /विना अनुदानित असल्याचा तपशिल, पदाचे मानधन व वेतनश्रेणी इ. बाबींची तपासणी करण्यात यावी.

आ) उमेदवारास नियुक्ती देताना महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली, १९८१ मधील नियम ९ नुसार झालेली असेल याची काटेकोरपणे काळजी घेण्यात यावी. तथापि, अल्पसंख्यांक संस्थांस आरक्षण धोरण लागू नसल्याने बिंदूनामावलीची आवश्यकता नाही.

इ) पद रिक्त होण्याचे कारण नमूद करण्यात आलेले असावे. याव्यतिरिक्त वस्तुस्थितीशी विसंगत तपशील देवून नेमणूक केलेली असल्याचे आढळल्यास संबंधितांची वैयक्तिक मान्यता तात्काळ रद्द करुन सदर कर्मचा-याने दरत्यानच्या कालावधीत केलेल्या कामाचे वेतन/मोबदला संबधित संस्थेने देणे बंधनकारक राहील.

ई) वैयक्तिक मान्यता प्रदान करताना संबंधित कर्मचा-याचा हजेरीपटावरील (मस्टरवरील) उपस्थितीचा तपशिल कर्मचा-याने घेतलेले मानधन/वेतनाचा तपशील इ. बाबींची देखील तपासणी करण्यात येईल.

१०. याशिवाय शैक्षणिक संस्था/शाळांमधील पदभरतीस बंदी, समायोजनव इतर बाबत शासनाने वेळोवेळी काढलेले सुधारित निर्णय/नियम (ज्यामध्ये अल्पसंख्यांक संस्थांना वगळलेले नाही) अल्पसंख्यांक संस्थांना लाग राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१२१३११३४१५०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas Laxman Dhakane

Digitally signed by Kailas Laxman Dhakane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SD and ED, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6283d0b58cf739d67ca64d094986494b972b39cf4df46464c9bd30ae8293d9de, cn=Kailas Laxman Dhakane
Date: 2017.09.12 13:01:01 +05'30'

(कैलास ढाकणे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री (कौ.वि.व उ.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी सादर.

२) मा. राज्यमंत्री (कौ.वि.व उ.) यांचे खाजगी सचिव यांना माहितीसाठी सादर.

३) मा. सचिव, कौशल्य विकास व उद्याजकता विभाग यांचे स्वीय सहायक.

४) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.

५) उप सचिव (व्यशि), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, यांचे स्वीय सहायक. मंत्रालय, मुंबई-३२

६) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई-१

७) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, (शालेय शिक्षण विभाग), मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत.)

८) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद /अमरावती /नागपूर (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत.)

९) संबंधित जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालया मार्फत.)

१०) निवड नस्ती (व्यशि-४)